Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण २७ :

# वयात येताना काळजी कशी घ्याल?

मुलामुलींमध्ये वयात येताना शारीरिक आणि मानसिक बदल होत असतात. शारीरिक बदल काय होतात, त्याचे वय काय असते, वयाअगोदर हे बदल झाले किंवा वय वाढले तरी बदल झालेच नाही तर काय करावे ह्याची माहिती आज तज्ज्ञांकडून करूनं घेऊया


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवाद : डॉ. संध्या कोंडपल्ले

पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोळकर, उज्वल करमळकर

*Convener:* **Anurag Bajpai**

*Members:* **PA Mohammed Kunju, Ravi Ambey, Sangeeta Yadav**

*Reviewer:* **Sangeeta Yadav**




## नेहमी विचारले जाणारे १० प्रश्न

१ माझी मुलगी सात वर्षांची आहे आणि अशातच माझ्या लक्षात आलंय की तिच्या छातीचा आकार वाढू लागला आहे. डॉक्टर, मला काळजी वाटते आहे. हे खूप लवकर होतंय का? मला तुमचा सल्ला हवाय.

२ माझा मुलगा फक्त आठ वर्षांचा आहे आणि आत्ताच त्याला मिसरूड फुटू लागली आहे. डॉक्टर, मी काय करू?

३ मुले लवकर वयात येण्याची कारणे कोणती? आणि त्यावरील उपाय कोणते?

४ माझी मुलगी सोळा वर्षांची आहे पण अजूनही तिच्यामध्ये वयात येण्याची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. मी काय करू?

५ माझा मुलगा आता अठरा वर्षांचा झालाय पण अजून त्याला दाढी-मिशा काहीच दिसत नाहीत. मी काय करू?

६ माझा मुलगा सध्या आठ वर्षांचा आहे. परंतु त्याच्या शिश्नाचा आकार त्यामानाने खूपच लहान दिसतो. कृपया मला मार्गदर्शन करा.

७ एखादे मूल योग्य वयात पौगंडावस्थेची लक्षणे दाखवत नसेल तर त्यावरील उपाय कोणते?

८ माझा मुलगा १३ वर्षांचा आहे आणि अशात त्याच्या छातीचा आकार वाढू लागलेला आहे. त्याचे मित्र त्यावरून त्याला खूप चिडवतात. मी काय करू?

९ माझी मुलगी १५ वर्षांची आहे.तिच्या चेहऱ्यावर व ओठांच्यावर हल्ली केसांची वाढ दिसू लागली आहे. तिला काय आजार झाला असेल? आणि त्यावर काय उपाय करावे लागतील?.

१० पुरुषांप्रमाणे मुलींमध्ये चेहरा, छाती, पाठ इत्यादी ठिकाणी केसांची वाढ होत असेल तर त्यावर उपाय काय?

**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**


**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

27

# वयात येताना काळजी कशी घ्याल?


प्रश्न
(१)

**माझी मुलगी सात वर्षांची आहे आणि अशातच माझ्या लक्षात आलंय की तिच्या छातीचा आकार वाढू लागला आहे. डॉक्टर,मला काळजी वाटते आहे. हे खूप लवकर होतंय का? मला तुमचा सल्ला हवाय.**

मुलींमध्ये वयात येण्याची प्रक्रिया साधारणपणे वयाच्या दहा वर्षांच्या आसपास सुरू होते (आठ ते तेरा वर्ष). मुलगी वयात येण्याचं सर्वात पहिलं लक्षण म्हणजे छातीचा आकार वाढणे. त्यानंतर गुप्तांगावर केस येऊ लागतात. यापैकी कोणताही बदल वयाच्या आठ वर्षांपूर्वी झाला तर त्याकडे लक्ष द्यायलाच हवे व ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. मुलीची वाढ व वयात येण्याची लक्षणे तपासून नंतर डॉक्टर तिच्या हाताचा एक्स-रे काढतील (हाडाचे वय समजून घेण्यासाठी-bone age) आणि काही हार्मोन्सची तपासणी करतील, तसेच पोटाची सोनोग्राफी करून घेतील.

| वयात येण्याच्या लक्षणांचा साधारण कालावधी | | | |
|---|---|---|---|
| **लक्षणे** | **साधारण** | **लवकर** | **उशीरा** |
| छातीची वाढ | १० ते ११.५वर्षे | ८ वर्षे | १३ वर्षे |
| गुप्तांगावर केस येणे | १० ते ११.५ वर्षे | ८ वर्षे | १३ वर्षे |
| मासिक पाळी | ११ ते १३ वर्षे | ९.५ वर्षे | १५ वर्षे |
| वृषणाचा किंवा अंडाशयाचा आकार वाढणे | ११ ते १३ वर्षे | ९ वर्षे | १४ वर्षे |


- मुलींमध्ये वयात येण्याची लक्षणे लवकर दिसू लागली तर पालकांना मुख्य काळजी असते ती म्हणजे मासिक पाळी खूप लवकर सुरू होईल का? आणि त्याचा माझ्या मुलीच्या उंचीवर आणि मानसिकतेवर काय परिणाम होईल?
  - साधारणपणे छातीची वाढ सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी मासिक पाळी सुरू होते पण मुलगी जर अनैसर्गिकरित्या लवकर वयात येत असेल, तर हा कालावधी कमी असू शकतो. काही मुलींमध्ये छातीचा आकार वाढण्याची प्रक्रिया लवकर सुरू होते, परंतु मासिक पाळी येण्यास बराच कालावधी लागतो. अशा वेळी कोणत्याही उपचारांची गरज नसते.



उंचीची झपाट्याने वाढ



हाडाचे वय वाढणे



सोनोग्राफी

**आकृती १ :** लवकर वयात येताना दिसणारी लक्षणे

  - लवकर वयात येणाऱ्या मुली या वयाच्या मानाने अधिक उंच दिसू लागतात व त्यांच्या हाडांची वाढ वयाच्या मानाने खूपच जास्त असते मुलींच्या बाबतीत हाडांची वाढ (Bone age) १४ वर्षे इतकी झाली की त्यांची उंची वाढणे थांबते. त्यामुळे लवकर वयात येणाऱ्या मुलींच्या हाडांची वाढ लवकर पूर्ण होते व त्याचा परिणाम उंचीवर होऊ शकतो. या मुली त्यांच्या आनुवंशिकतेच्या मानाने कमी उंचीच्या होतात.
  - ज्या मुली खूप लवकर वयात येतात त्यांचा शारीरिक व भावनिक विकास पूर्ण झालेला नसतो. त्यामुळे त्या गोंधळून जातात आणि इतर मुलांमध्ये मिसळताना त्यांना ओशाळल्यासारखे वाटते. त्यामुळे त्यांचे वागणे बदलते. स्वतःबद्दल त्यांना गंड वाटू लागतो या सगळ्यामुळे काही वेळा त्यांचे लैंगिक शोषण होण्याची शक्यता असते
- अशा वेळी मुलींचे वय व पौगंडावस्थेच्या वाढीचा वेग यावरून कोणत्या प्रकारच्या तपासण्या करायच्या हे ठरवले जाते. सर्वात प्रथम डाव्या हाताचा व मनगटाचा एक्स-रे काढून त्यावरून हाडांची वाढ (Bone age) पाहिली जाते ज्यायोगे पौगंडावस्थेतील बदल किती प्रमाणात झालेले आहेत हे समजते. जर हाडांची वाढ वयानुसार योग्य असेल तर पुढील हार्मोन्सच्या चाचण्या करण्याची गरज नसते परंतु डॉक्टरांकडून नियमित तपासणी करून शारीरिक बदलांवर बारीक लक्ष ठेवणे मात्र गरजेचे असते.

प्रश्न (२)

## माझा मुलगा फक्त आठ वर्षांचा आहे आणि आत्ताच त्याला मिसरूड फुटू लागली आहे. डॉक्टर, मी काय करू?

मुलग्यांमध्ये वयात येण्याची प्रक्रिया ही साधारणपणे वयाच्या बारा वर्षांच्या आसपास सुरू होते. (९.५ ते १४ वर्षे) सर्वात प्रथम वृषणाचा (Testes) आकार वाढू लागतो, गुप्तांगावर केस येऊ लागतात व त्यानंतर दाढीचे केस वाढू लागतात **(आकृती २)**. साडे नऊ वर्षांच्या आधी यातील कुठलीही लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा




**आकृती २ :** मुलांमध्ये लवकर वयात येत असल्याचे दर्शविणारी लक्षणे

- मुलांच्या बाबतीत जर वयात येण्याचे बदल लवकर दिसू नयेत असतील तर त्यामागे एखादा गंभीर आजार किंवा शारीरिक अथवा मानसिक समस्या असण्याची शक्यता मुलींपेक्षा जास्त असते. त्यांच्यातील वयात येताना होणाऱ्या बदलांची गती खूप जास्त असते व त्यांची उंची कमी राहण्याची शक्यता ही मुलींपेक्षा अधिक असते.

## प्रश्न (३)

## मुले लवकर वयात येण्याची कारणे कोणती? आणि त्यावरील उपाय कोणते?

- मेंदूमधील पियुषिका ग्रंथी अथवा जननग्रंथी (मुलांमध्ये वृषण अथवा Testes आणि मुलींमध्ये अंडाशय किंवा Ovary) या ग्रंथीमधून स्त्रवणाऱ्या संप्रेरकांचे प्रमाण वाढल्यास मुले किंवा मुली लवकर वयात येतात. लवकर वयात येणाऱ्या मुलींपैकी जवळजवळ ९०टक्के मुलींमध्ये कोणतेही शारीरिक दोष नसताना वयात येण्याची प्रक्रिया लवकर सुरू होते. क्वचित प्रसंगी मुलींमध्ये मेंदूमधील काही आजारांमुळे किंवा अंडाशयातील गाठींमुळे अथवा थायरॉईडच्या आजारामुळे मुलींमध्ये वयात येण्याची लक्षणे लवकर दिसू लागतात. लवकर वयात येण्यामागे काही आजार असण्याची शक्यता ही मुलांमध्ये मुलींपेक्षा ५० टक्क्यांनी जास्त असते आणि यामागे मेंदू किंवा वृषणाचे आजार असू शकतात. कधीकधी मेंदूतील गाठ हेदेखील कारण असू शकते. त्यामुळे मुलगा किंवा मुलगी लवकर वयात येत असतील तर डोकेदुखी, उलट्या अशा लक्षणांबद्दल विचारणा करायला हवी.
- तपासणीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुलगा किंवा मुलगी खरोखरच लवकर वयात येत आहे याचे निश्चित निदान करणे. विशेषतः मुलींमध्ये चरबीचे प्रमाण वाढल्यामुळे छातीचा आकार मोठा दिसू शकतो (Lipomastia). लवकर वयात आल्याची खात्री पटल्यावर त्यामागील कारण शोधण्यासाठी डॉक्टर तुम्हाला काही रक्ताच्या तपासण्या व डाव्या हाताचा एक्स–रे करण्याचा सल्ला देतील. काहीवेळा मेंदूचा MRI व पोटाची सोनोग्राफी किंवा सिटीस्कॅन करण्याचीही गरज असते.
- वयात येण्याची प्रक्रिया थांबवून हाडांच्या वाढीची गती कमी करणे व मुलांची किंवा मुलींची उंची जास्तीत जास्त वाढावी यासाठी उपचार करता येतात. (Central precoucious puberty) मेंदूतील ग्रंथीमधील हार्मोन्सच्या वाढीमुळे मूल लवकर वयात येत असेल तर हे थांबवता यावे यासाठी सुरक्षित व खात्रीशीर इंजेक्शन्स उपलब्ध आहेत.दर दोन ते तीन महिन्यांनी इंजेक्शन्स द्यावी लागतात. मुलींमध्ये साधारणपणे दहा ते अकरा वर्षे व मुलांमध्ये ११ ते १२ वर्षांपर्यंत ही इंजेक्शन्स दिली जातात.

## प्रश्न (४)

## माझी मुलगी सोळा वर्षांची आहे पण अजून ही तिच्यामध्ये वयात येण्याची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. मी काय करू?

- मुलींमध्ये तेरा वर्षांपर्यंत छातीची वाढ दिसून येत नसेल किंवा सोळा वर्षांपर्यंत मासिक पाळी आली नसेल तर लवकरात लवकर तपासणी करून घेणे गरजेचे आहे.
- मुली उशीरा वयात येणे किंवा वयात येण्याची लक्षणेच न दिसणे यामागे दीर्घकालीन आजार, कुपोषण,अंडाशय किंवा पिट्युटरी ग्रंथीतील दोष अशी कारणे असू शकतात.
  - उशीरा वयात येण्यामागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे (Constitutional delay in growth and puberty ३०%) निसर्गतः उशीरा वयात येणे. यामध्ये मेंदूतील ग्रंथी उशिरा कार्यरत होतात परंतु या मुलींची शारीरिक व लैंगिक वाढ पूर्ण होते.
  - इतर कारणांमध्ये मेंदूतील दोष (उदा. पिट्युटरी ग्रंथी किंवा हायपोथॅलॅमसला इजा होणे, जंतूसंसर्ग किंवा रेडिएशनमुळे होणारी इजा) ही कारणे असू शकतात. याशिवाय अंडाशयातील दोष (टर्नर सिंड्रोम, रेडीएशनमुळे होणारी इजा किंवा रोगप्रतिकारक शक्तीतील दोष) अशा कारणांमुळे ही मुलींमध्ये योग्यवेळी वयात येण्याची लक्षणे दिसत नाहीत
  - कुपोषण किंवा शारीरिक आजार (किडनी, हृदय, लिव्हरचेआजार, सिलिऍक डिसिज ही पण उशिरा वयात येण्याची कारणे असू शकतात.
- उशीरा वयात येण्यामुळे मुलींची हाडे ठिसूळ होतात आणि मानसिक आरोग्यावर व सामाजिक संबंधांवर ही त्याचे विपरीत परिणाम होतात.
  - उशीरा वयात येणाऱ्या मुलींची उंची योग्य प्रमाणात वाढत नाही. त्या बुटक्या राहतात व शाळेतील मुलींचे कुत्सित शेरे व टीका त्यांना सहन करावी लागते. इस्ट्रोजेनच्या कमतरतेमुळे हाडांचे आरोग्य नीट राहत नाही व प्रौढत्वातही हाडे ठिसूळच रहातात.
  - सामाजिक संबंधांवर व नातेसंबंधांवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. मुलींचे मानसिक आरोग्य धोक्यात येते. मुली उशिरापर्यंत वयात न येणे ही गंभीर बाब असून योग्य वयात त्यावर इलाज न केल्यास किंवा अपूर्ण उपचारांमुळे गर्भधारणेवरही परिणाम होऊ शकतात व कायमचे वंध्यत्व येऊ शकते.

### प्रश्न (५)

## माझा मुलगा आता अठरा वर्षांचा झालाय पण अजून त्याला दाढी-मिशा काहीच दिसत नाहीत. मी काय करू?

- १४ वर्षांपर्यंत मुलग्यांमध्ये वयात येण्याची कोणतीच लक्षणे दिसत नसतील (वृषणाची Testes वाढ होणे किंवा गुप्तांगावर केस येणे) तर त्याला वयात यायला उशीर होतो आहे हे लक्षात घ्यायला हवे आणि यामागची कारणे शोधण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.
- मुलगा उशीरा वयात येण्यामागे त्याच्या मेंदूतील ग्रंथी किंवा वृषणातील दोष ही कारणे असू शकतात. कोणत्याही दीर्घकालीन आजारामुळेसुद्धा मुलगे वयात यायला उशीर होऊ शकतो.
  - मुलगे उशीरा वयात येण्याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे आनुवंशिकतेनुसार उशिरा उंची वाढणे ( Constitutional delay in growth and puberty ७०%) या मुलांची वाढ त्यांच्या वयाच्या इतर मुलांपेक्षा मंद असते व बऱ्याच काळापर्यंत ती इतरांपेक्षा बुटकी किंवा कमी उंचीची दिसतात. अधिक विचारणा केली असता हे लक्षात येते की त्यांच्या वडिलांची उंचीसुद्धा उशिरापर्यंत वाढत होती व समवयस्क मुलांपेक्षा त्यांना उशिरा दाढी-मिशा आलेल्या होत्या.
  - पिट्युटरी ग्रंथीतीलदोष (जंतुसंसर्ग,मेंदूला इजा होणे, रेडिएशन) तसेच वृषणातील दोष (वृषणाला इजा होणे, क्लाईनफेल्टरसिंड्रोम, वृषणाच्या मुळाला पीळ पडणे) इत्यादी कारणांमुळे काही मुलांमध्ये योग्य वयात पौगंडावस्थेची लक्षणे दिसत नाहीत .
  - उशिरा वयात येणाऱ्या मुलांची वाढही योग्य पद्धतीने होत नाही. त्यांची उंची कमी राहते, हाडे ठिसूळ होतात, मानसिक विकासही योग्यरित्या होत नाही आणि वंध्यत्वसुद्धा येऊ शकते ही मुले तणावग्रस्त असतात, इतर मुलांपासून वेगळे पडतात, मित्रांकडून त्यांचा मानसिक छळ होऊ शकतो.
- समवयस्कांबरोबर मैत्रीपूर्ण नातेसंबंध तयार होत नाहीत. स्वतःच्या शरीराबद्दल लाज किंवा न्यूनगंड वाटू लागतो, स्वतःबद्दलचा आदर कमी होतो व ही मुले पुढे मानसिक ताणतणाव व नैराश्याची शिकार होतात. सामाजिक आणि विकासाच्या संधींपासूनही दूर राहतात.

### प्रश्न (६)

## माझा मुलगा सध्या आठ वर्षांचा आहे. परंतु त्याच्या शिश्नाचा आकार त्यामानाने खूपच लहान दिसतो. कृपया मला मार्गदर्शन करा.

- शिश्नाचा आकार हा पिच्युटरी ग्रंथी किंवा अंडाशयातील दोषांमुळे लहान असू शकतो. बरेचदा पालकांना जरी मुलाच्या शिश्नाचा आकार लहान वाटत असेल तरी कित्येकदा प्रत्यक्ष तपासणी नंतर डॉक्टरांच्या लक्षात येते की वयानुसार त्याच्या शिश्नाची लांबी व आकार योग्यआहे. विशेषतः अतिरिक्त लठ्ठपणामुळे मुलांचे शिश्न हे आजूबाजूच्या चरबीमुळे आत जाते व त्याचा आकार लहान असल्याचा भास होतो
- शिस्नाची वाढ ही टेस्टोस्टेरॉन या पुरुषांमधील हार्मोनवर अवलंबून असते आणि त्याच्या वाढीचा मोठा टप्पा आईच्या पोटात मूल असताना व पहिल्या वर्षातच पार पडतो. त्यानंतर वयात येईपर्यंत त्यात फारशी वाढ होत नाही. त्यामुळे एक वर्षानंतरही जर मुलाचे शिश्न लहान दिसत असेल तर त्यासाठी लवकरात लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.
- मुलांची संपूर्ण तपासणी व शिश्नाचा आकार (लांबी/रुंदी) यांची अचूक मोजणी टेपच्या सहाय्याने करून व सामान्य तक्त्यावरील मापांशी पडताळणी करून डॉक्टर त्या मुलाचे शिश्न खरोखरच वयाच्या मानाने लहान आहे का हे ठरवू शकतात. बऱ्याच मुलांमध्ये या तपासणीनंतर शिश्नाचा आकार नॉर्मल असल्याचे आढळून येते. रक्ताच्या काही तपासण्या व कधीकधी मेंदूचा एमआरआय केल्यानंतर बऱ्याचअंशी अचूक निदान करता येते. त्यानंतर डॉक्टरांना पुढील उपचारांची दिशा ठरवता येते. नियमित तपासणी व हार्मोन्सच्या इंजेक्शनची आवश्यकता आहे की नाही हे ठरवता येते. अशा सर्व मुलांमध्ये शिस्नाचा आकार सामान्य वाटला तरीही पुन्हा एकदा वयाच्या १३ ते १४ वर्षे वयाला त्यांची संपूर्ण तपासणी व वयात येतानाचे बदल दिसत आहेत ना हे पडताळून पाहणे गरजेचे असते.

प्रश्न (७)

## एखादे मूल योग्य वयात पौगंडावस्थेची लक्षणे दाखवत नसेल तर त्यावरील उपाय कोणते?

- मूल खरोखरच उशीरा वयात येत आहे याची खात्री करणे, त्यामागील कारणांचा शोध लावणे व त्यावर योग्य ते उपचार योग्य त्या वयात करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. डॉक्टर सर्वप्रथम शारीरिक तपासणी, काही रक्ताच्या चाचण्या, डाव्या हाताचा एक्स-रे आणि क्वचित मेंदूचा एमआरआय करून मूल खरोखरच उशीरा वयात येत आहे याची खात्री करून घेतील.
- त्यानंतर वयात येण्याची सामान्य लक्षणे तुमचा मुलगा किंवा मुलगी यामध्ये दिसायला हवी त्यासाठी डॉक्टर औषधोपचार सुरू करतील. साधारणपणे मुलींमध्ये १३ वर्षांनंतर तर मुलांमध्ये १४ वर्षांनंतर हे उपाय सुरू केले जातात.
- मुलींमध्ये इस्ट्रोजेन नावाचे हार्मोन सुरुवातीला अत्यंत कमी प्रमाणात चालू केले जाते व पुढील दोन वर्षांमध्ये त्याची मात्रा हळूहळू वाढवली जाते, ज्यायोगे मुलींमध्ये निसर्गत: जसा वाढतो त्याच पद्धतीने छातीचा आकार वाढू लागतो. याउलट आनुवंशिकतेनुसार वाढ व वयात येणे उशिरा होत असेल (CDGP) तर केवळ तीन ते सहा महिन्यांची उपायोजना पुरेशी असते.
- मुलांमध्ये टेस्टोस्टेरॉन नावाचे हार्मोन इंजेक्शनद्वारे कमी डोसमध्ये चालू केले जाते व पुढील दोन वर्षात हळूहळू त्याचा डोस वाढवला जातो. मुलींप्रमाणेच अनुवंशिकतेनुसार उशिरा वयात येणाऱ्या मुलांमध्ये (CDGP) तीन ते सहा महिन्यांचे उपाय पुरेसे असतात तर कायमचा शारीरिक दोष असल्यास बऱ्याच काळापर्यंत उपाययोजना चालू ठेवाव्या लागतात.
- लग्नानंतर मूल होण्याबाबत समस्या निर्माण झाल्यास त्यावेळी पुन्हा एकदा स्वतंत्रपणे उपचार करणे गरजेचे असते.

प्रश्न (८)

## माझा मुलगा १३ वर्षांचा आहे आणि अशात त्याच्या छातीचा आकार वाढू लागलेला आहे. त्याचे मित्र त्यावरून त्याला खूप चिडवतात. मी काय करू?

- साधारणत: ४० ते ७५ टक्के मुलांमध्ये वयात येताना स्तनांचा आकार वाढतो. पुरुष संप्रेरक (टेस्टोस्टेरॉन) व स्त्रीसंप्रेरक (इस्ट्रोजेन) यांच्यातील असंतुलनामुळे असे होऊ शकते. सर्वसाधारणपणे दोन वर्षात हळूहळू हा आकार कमी दिसू लागतो. कधीकधी छातीवर अतिरिक्त चरबी साठल्यासही (Lipomastia) छातीचा आकार मोठा दिसू लागतो. क्वचितप्रसंगी वयात येण्याच्या प्रक्रियेतील दोष, किडनी किंवा लिव्हरचे आजार किंवा काही औषधांचा दुष्परिणाम म्हणूनही छातीचा आकार वाढू शकतो. वेळेत वैद्यकीय सल्ला घेतल्यास त्याची खात्री करता येते. मुलगा व पालक दोघांचीही अकारण चिंता दूर होऊ शकते.
- डॉक्टर सर्वप्रथम निदान निश्चित करून इतर काही गंभीर आजार नाही ना याची खात्री करून घेतात व त्यावरील उपाय निश्चित करतात. अतिरिक्त लठ्ठपणामुळे छातीचा आकार मोठा दिसत असेल तर वजन कमी करणे आवश्यक असते. डॉक्टर त्या मुलाची पौगंडावस्था कोणत्या स्थितीत आहे हे पाहतात. तसेच छातीची व्यवस्थित तपासणी करतात. आवश्यक त्या रक्ताच्या तपासण्या तसेच गरज असल्यास सोनोग्राफी करून घेतात.
- यापैकी बहुतांश मुलांमध्ये हळूहळू छातीचा आकार नॉर्मल होऊ लागतो. वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत हा आकार कमी न झाल्यास काही थोड्या मुलांमध्ये शस्त्रक्रिया करावी लागते.



Ch-027.indd 8 11-08-2021 16:38:04

प्रश्न
(९)

## माझी मुलगी १५ वर्षांची आहे. तिच्या चेहऱ्यावर व ओठांच्यावर हल्ली केसांची वाढ दिसू लागली आहे. तिला काय आजार झाला असेल? आणि त्यावर काय उपाय करावे लागतील?

- वयात येताना काही मुलींच्या चेहऱ्यावर केसांची वाढ दिसू लागते परंतु चेहरा, हनुवटी, छाती व पोटाच्यामधील भागावर अतिरिक्त प्रमाणात केसांची वाढ दिसत असेल तर त्यामागे संप्रेरकांमधील दोष हे कारण असू शकते. सर्व शरीरावर जर बारीक लव दिसत असेल तर त्यामागे आनुवंशिकता हे कारण असते. त्यामध्ये संप्रेरकांमधील बिघाड हे कारण असण्याची शक्यता नसते.
- चेहऱ्यावरील केस जर जास्त प्रमाणात वाढत असतील, स्नायू पुरुषांप्रमाणे पिळदार दिसत असतील, मासिकपाळी अनियमित येत असेल, आवाजात बदल वाटत असेल तर लवकरात लवकर संपूर्ण तपासणी करून घेणे आवश्यक आहे
- चेहऱ्यावर किंवा छातीवर जास्त प्रमाणात केसांची वाढ होत असेल तर अंडाशय (PCOS , स्त्रीबीज तयार होण्यातील दोष) किंवा ॲसिड ॲड्रीनल ग्रंथी (जन्मजातदोष, ट्युमर्स), स्थूलता किंवा औषधांचे दुष्परिणाम अशीही कारणे त्यामागे असू शकतात.

प्रश्न
(१०)

## पुरुषांप्रमाणे मुलींमध्ये चेहरा, छाती, पाठ इत्यादी ठिकाणी केसांची वाढ होत असेल तर त्यावर उपाय काय?

- मुलींच्या चेहऱ्यावर, छातीवर व पाठीवर जर मुलांप्रमाणे केसांची वाढ होत असेल तर सर्वात प्रथम ही वाढ नैसर्गिक नसून पुरुषांप्रमाणे आहे याची खात्री करावी लागते. त्यानंतर त्यामागील कारणांचा शोध घेऊन उपचारांची दिशा ठरवावी लागते.
- डॉक्टर तुमच्या मुलीची संपूर्ण तपासणी करून केसांची वाढ कुठे व किती प्रमाणात आहे हे पाहतील. त्यानंतर वयात येण्याच्या कोणत्या टप्प्यापर्यंत तिची शारीरिक वाढ झालेली आहे हे पाहतील. तिचा रक्तदाब तपासून पाहतील. त्यानंतर रक्ताच्या काही तपासण्या, गर्भाशय व अंडाशयांची सोनोग्राफी किंवा सिटीस्कॅन करतील.
- तुमच्या मुलीचे वय आणि आजाराची तीव्रता यावर तिला उपचारांची खरोखर गरज आहे का हे ठरविण्यात येईल.लठ्ठमुलींमध्ये वजन कमी करणे अत्यावश्यक असते. PCOD हा आजार असेल तर अशा मुलींना कमीतकमी एक वर्षापर्यंत हार्मोन्सच्या गोळ्या घ्याव्या लागतात. या सर्व उपचारांचा परिणाम दिसण्यास बराच काळ लागतो. त्या दरम्यान चेहऱ्यावरील अतिरिक्त केसांसाठी इतरही सौंदर्यउपचार (वॅक्सिंग,लेझरथेरपी किंवा इतर उपाय ) करावे लागतात.